जाहीर सूचना

मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, एस्प्लनेड, मुंबई—४००००१.

मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेअंतर्गत येणाऱ्या सर्व न्यायालयीन केंद्रांमध्ये एकूण १७ बायोमेट्रीक्स प्रणालीच्या देखभालीचा एक वर्षासाठी करार करण्याचे योजीले आहे. सदरची बायोमेट्रीक्स प्रणाली ही eSSL-X990 (Lan Based Biometric Attendance System) हया कंपनी / मॉडेलची आहे. बायोमेट्रीक्स प्रणालीच्या यंत्रणेच्या १७ नगांच्या (Units) च्या वार्षिक देखभालीकरीता अनुभवी संस्था (Agency) यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे. तरी निविदा मोहोरबंद पाकिटात, सूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत मुख्य न्यायदंडाधिकारी, महापालिका मार्ग, एस्प्लनेड न्यायालय, मुंबई या पत्यावर कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पाठवून द्याव्यात. तसेच, निविदा बंद पाकिटामध्ये घालून त्यावर “बायोमेट्रीक्स प्रणालीच्या देखभालीकरीता निविदा” असे स्पष्ट लिहावे.

उशीरा आलेल्या निविदा गृहीत धरल्या जाणार नाही याची संबंधित ठेकेदारांनी नोंद घ्यावी. तसेच निविदा मंजूर करण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार मुख्य न्यायदंडाधिकारी यांस राहतील.

(अ. कृ. मांडवगडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.

दिनांक : १२/०२/२०२६

D:\Office of CMM\Letters\Tender Notice.odt